ISSN 2249-894X Impact Factor : 3.8014 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research


# बारोमास  एक आकलन .स्त्रीवादी दृष्टिकोन

प्रा.घनश्याम आनंदगिर गिरी
श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय ,
सावळज तासगाव ,जि.सांगली

स्त्रीवाद विचार प्रामुख्याने पाश्चात्य देशामध्ये २० व्या शतकामध्ये रूजलेला आढळतो. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांची पुरूषांच्या बरोबरीने जगण्याचा एक नवा विचार अमेरिकेमध्ये १९६० नंतर प्रचार झालेला आढळतो. पाश्चात्य देशात शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये स्त्रिया बरोबरीने शिक्षण घेऊ लागल्या. नोकरी व व्यवसायामध्ये येऊ लागल्या. आतापर्यंत घरांमध्ये अडकलेल्या स्त्रिया घराबाहेर पडल्या. व एक वेगळे स्वातंत्र्य अनुभवु लागल्या. पैसा हाती आल्यामुळे जगण्याचे एक वेगळे बळ निर्माण झाले. एरवी जगण्याची झालेली कोंडी या कोंडीतून ती बाहेर पडली. आपली स्वत्वाची ओळख निर्माण झाली.व बिनधास्तपणे जीवन जगू लागल्या. असे हे स्त्रीमुक्तीचे वारे जगभर पसरले. भारतामध्ये यायला 1970–75 साल उजाडले.

महाराष्ट्रांमध्ये हा स्त्रीवाद यायला ८0चे दशक आले.समाज जीवनामध्ये नोकरी करू लागल्या. व हे करीत असताना पुरूषसत्ताक कुटुंब व्यवस्थेमध्ये त्यांना त्रास होऊ लागला. ग्रामीण जीवनामध्येही आमूलाग्र बदल होऊ लागला. 1970 नंतरच्या पिढीतील मुली शिक्षण घेऊन 1990च्या दशकामध्ये काहींनी शहरामध्ये येऊन नोकरी स्वीकारली. तर काही स्त्रियांनी गृहिणी म्हणून जीवन स्वीकारले शहरी जीवनाचे वारे खेडयापर्यंत येऊन पोहचले व एकत्रित कुटुंबपध्दतीला हळूहळू तडे जाऊ लागले. विभिन्न कुटुंबपध्दती अस्तित्वात येऊ लागली. मी, माझी पत्नी व माझी मुले अशी जगण्याची नवी पध्दती आली.

ज्या स्त्रियांना 'स्व' बद्दल मांडावेसे वाटले.अशा प्रतिभावान स्त्रियांनी वेगवेगळया वाड्.मय प्रकारांतून स्वानुभव, जीवनानुभव मांडले. असा हा स्त्रीवादी विचार नवा दृष्टिकोन साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागला.ग्रामीण साहित्यामध्ये स्त्रीजीवनाचे चित्रण, कथा, कादंबरी, कविता इ. वाड्.मय प्रकारांच्या माध्यमातून आलेले आढळते. पण हे स्त्रियांचे जीवन त्यांच्या व्यथा, वेदना पुरूष लेखकांनीच जास्त प्रमाणात मांडलेल्या आढळतात.प्रतिमा इंगोले,बहिणाबाई चौधरी, किर्ती मुळीक यांसारख्या स्त्री लेखिका अपवादात्मक सोडल्या तर संबंध लेखकांनीच स्त्री जीवन समर्थपणे मांडलेले आढळते.हे आपल्या लक्षत येते.



'बारोमास' ही कादंबरी २००२ मध्ये प्रकाशित झाली. सदानंद देशमुख यांनी ही कादंबरी लिहिली असून या कादंबरीतील स्त्रियांचे चित्रण आधुनिकता व पारंपरिकता या दोन धाग्यांना जोडणारे असे मांडले आहे.बारोमासमध्ये लेखकाने शेवंतामाय गुंपामामी व मुक्ता इ. स्त्रिया ग्रामीण परंपरेषी निगडीत असणाऱ्या मांडलेल्या आहेत. तर अलका व ममता वारे या मध्यमवर्गीय शहरी जीवन जगणाऱ्या कुटुंबातील आधुनिक स्त्री मांडली आहे.

शेवंतामाय हे या कादंबरीतील महत्वाचे स्त्री व्यक्तिचित्र. महानुभाव संप्रदायाचे आचार–विचार जोपासणाऱ्या कुटुंबात ती वाढलेली तर तिचे पती सुभानराव वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान, आचार–विचार अंगिकारणारे अशा दोन्ही विचारांना पुढे घेऊन जाणारी ग्रामीण जीवनातील अशिक्षित, निरक्षर असली तरी एक जगण्याचे तत्वज्ञान समजणारी शेवंतामाय लेखकाने मांडलेलेली आहे.परंपरागत पिढया न् पिढयातील मागील तिची आई व आजी जशा कुटुंबासाठी राबल्या तशीच ती राबते.आपल्या मुलाबाळांसाठी राबते. मुलांसाठी अर्ध्या रात्री डबा करून देते. नवरा व मुलांचे कपडे धुते. स्वयंपाक उरकून शेतातही नवऱ्याबरोर राबते. असे हे राबणे म्हणजे ते आपले कर्तव्यच आहे असे ती समजते.दोन्ही मुले जेव्हा मोठी होतात. शिक्षण घेऊन त्यांना नोकरी लागेल मग सून येईल ही तिची कल्पना असते. पण सगळेच उलटे होते.एकनाथ हा थोरला मुलगा पदव्युत्तर व बी.एड.चे शिक्षण घेतो.आज उदया नोकरी लागेल या आशेवर शहरी मुलीशी अलकाशी लग्न करतो.तिचे वडीली याच आशेवर मुलगी देतात. सून घरी आल्यावर सासू व सून यांचे पटत नाही.किरकोळ कारणावरून भांडणे होतात. सदानंद देशमुख यांनी येथे स्त्रीवादी विचार मांडताना अलकाने इथल्या ग्रामजीवनाला नाकारले आहे.तर शेवंतामायची या जीवनावर निष्ठा असलेली दिसते शेवंतामाय ही व्यक्तिरेखा खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील मागील पिढीतील सर्वांची आई वाटावी अशी माडणी लेखक सदानंद देशमुख यांनी केलेली आहे. तर गुंफामामीची व्यक्तिरेखाही परिस्थितीने पिचली गेल्याने जशी माणसाची अवस्था होते अशा अवस्थेत सापडलेली गुंफा मामीची प्रातिनिधिक व्यक्तिरेखा मांडलेली आहे.तशीच गुंफामामीची मुलगी मुक्ता तिच्या आयुष्याची परवडही मांडली आहे. तिचेही एक स्वप्न असते ते म्हणजे चांगला एकनाथसारखा नवरा मिळावा पण हे स्वप्न तिचे पूर्ण होत नाही.अशा पारंपरिक वळणाच्या व्यक्तिरेखाही लेखक सदानंद देशमुख यांनी मांडल्या आहेत.

अलका या व्यक्तिरेखेबद्दल बोलायचे झाले तर अलका ही शहरी संस्कृतीमध्ये वाढलेली आहे. शहरांमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रिया तिने पाहिलेल्या आहेत. तिलाही वाटते आपला नवरा नोकरीवाला किंवा व्यवसाय करणारा असावा.असे तिचे स्वप्न असते. आपणही नोकरी करावी स्वतःचे वेगळे घर असावे असे तिचे स्वप्न असते. पण तिचे हे स्वप्न सत्यात उतरत नाही. तेव्हा ती एकनाथसोबत खेडयात आल्यावर तिला या ग्रामीण व्यवस्थेशी जुळवून घ्यायला अवघड जाते.पण तरीही ती काम करीत राहते. पण जेव्हा–जेव्हा सासूशी भांडण होते. तेव्हा–तेव्हा ती आपल्या माहेरी येते. काही दिवस माहेरी राहिल्यावर नवऱ्यासोबत परत सासरी येते.पण हे सततच होत राहते.तेव्हा तिला सर्वांचाच राग येतो.व ती शेवटी कायमचीच माहेरी येते.

लेखक सदानंद देशमुख यांनी स्त्रीवादी भूमिका मांडताना अलकाने आपल्या बांगडया व मंगळसूत्र यांना हात लावू दिला नाही. तसेच दिरापासून होणारा त्रास सहन न करता उलट त्याच्याषी भांडते.शेवटी दिराने मारल्यावर ती कायमची माहेरी निघून जाते.विभक्त कुटुंबपध्दतीची ती पुरस्कर्ती दाखविलेली आहे. तसेच निमूटपणे नवऱ्याचा बलात्कार सहन करणारी अशी अलका नाही. एकनाथ मोहाडीला तिला न्यायला येतो तेव्हा एकांत पाहून तो तिच्या अंगावर हात टाकतो.तेव्हा ती हात झटकून म्हणते, "आधी असं घर बांधा, कमाई करा. वाटण्या करून घ्या. अन विका ते शेत. त्या पैशात डोनेशन देऊन कुठ जॉब मिळवा मग प्लॉट, बंगला, दिवाण, सोफा, फ्रिज सगळच येईल आपोआप दृका चाटायचं का ते शेत? टाका विकून त्यातले पाच लाख बॅंकेत टाका. महिन्याच दहा हजार व्याज मिळेल. पन्नास हजारात इथं मोहाडीत प्लॉट घेऊ. दोन लाखात घर बांधू.काहीही व्यवसाय करू. कॉम्प्युटर, झेरॉक्स, किंवा वहया पुस्तकांच दुकान .. दोघं सुखात राहू. ते गचाळ गाव ती गचाळ माणसं आता आता सोडून देऊ. हे मी पुन्हा–पुन्हा सांगत राहाते. तर माझं ऐकत नाही. फक्त माझा देह पाहिजे.स्वार्थी, नेभळट, कृतीशून्य. • • 1

अशी तिची भूमिका दिसते. तसेच बेकारीच्या काळामध्ये मूल होऊ न देण्याची काळजीही ती घेते.यामधून तिच्यातील आधुनिक विचारसरणी मांडलेली आढळते.

तसेच ममता वारे ही आणखी एक स्त्री व्यक्तिरेखा मांडली आहे. ती एका खेडेगावामध्ये षिक्षिका असून नवराही नोकरीला आहे. आर्थिक द्रश्टिने सबळता आल्यानंतर स्त्रियांना बिनधास्त जगण्याची भिती वाटत नाही. अशी ही ममता वारे तिला मूल बाळ बरेच वर्षे झाले तरी होत नाही. म्हणून ती मनातल्या भावनाही व्यक्त करते.

अलका जेव्हा माहेराहून वेळोवेळी परत येते.तेव्हा गर्भपात करून येते. अशा या गर्भपाताबद्दल तिला वाईट वाटते. ती अलकाला म्हणते, ''एकनाथकडे पाहून ती हसली तसच मग अलकाच्या ओटीपोटाकडे पाहून तिने विचारलं, 'तुम्ही आल्या वाटते तिजोरी खाली करून. अहो तुम्हाला झेपवत नसेल तर माझ्या तिजोरीत ठेवून जायचा धनमाल.

'तसं काही नाही.'पहा बरं! एखादया दिवशी माझ्या तिजारीत ठेवीन तुमचा धनमाल... काही हरकत नाही

'मग तयार करून ठेवू का माझी अंधारी खोली? पण आधी तुमच्या माडीत चांदणं पडू दया. मग आमचा अंधार उजळू▪ ▪ [2]

एकनाथपासून अलका वेळोवेळी गरोदर राहाते.यावर अलका किती नशिबवान आहे.एकनाथपासून आपल्याला मूल व्हायला काहीच हरकत नाही.पण या व्यवस्थेच्या कसे जायचे म्हणून ममता आपल्या मनातली खळबळ ती वरीलप्रमाणे ऐकवते.पाश्चात्य देशामध्ये कोणापासून मूल होऊ दयायचे हे संपूर्ण स्वातंत्र्य स्त्रियांना आहे.याची चाहूलच सदानंद देशमुख यांनी ममता वारेच्या व्यक्तिरेखेतून मांडली आहे.व भोगवादी संस्कृतीची आसक्ती असणारी बंगला ,गाडी व सुबत्तेच्या मागे जाणाऱ्या शहरी स्त्रिया ,मुक्त जीवनशैलीने जगणाऱ्या स्त्रियांपैकी अलकाची व्यक्तिरेखाही सदानंद देशमुख यांनी मांडलेली आहे.

यामधून आधुनिक काळामध्ये बदललेल्या स्त्रीचे दर्शन पहायला मिळते. स्त्रिया आता विचार करू लागल्या आहेत. 'स्व'ची त्यांना जाणीव झालेली आहे.म्हणून त्या थेटपणे नवऱ्याला बोलू लागल्या आहेत.अशी रोख ठोक बोलणारी अलका ही तत्कालीन काळातील प्रातिनिधिक प्रतिनिधी ठरते.असे म्हणावे लागेल.

## निष्कर्षः—

या कादंबरीमधून आधुनिक काळामध्ये बदललेल्या स्त्रीचे दर्शन होते. स्त्रिया आता विचार करू लागल्या आहेत.'स्व 'ची त्यांना जाणीव झालेली आहे.म्हणून त्या थेटपणे नवऱ्याला बोलूलागल्या आहेत.अशी रोख ठोक बोलणारी अलका ही तत्कालीन काळातील प्रातिनिधिक प्रतिनिधी ठरते. असे म्हणावे लागेल.

## संदर्भ ग्रंथ सूची

1)बारोमास —सदानंद देशमुख कॉन्टिनेंन्टल प्रकाषन पुणे.प्रथम आवृत्ती 2002 पान नं. 110
2)उ.नि.पान नं.126